जिल्हानिहाय ध्वजारोहण करणाऱ्या मंत्र्यांची यादी जाहीर
>> पान 2

६८ लाखांच्या गैरव्यवहारांसह ५० अकाउंटवरून १३ कोटी रुपयांची उलाढाल
>> पान 3

आयशर व ट्रक अपघातात एक जागीच ठार
>> पान 4

**सुविचार**

मूल्यांच्या आधारावर निर्णय घेतल्यास कधीही पश्चात्ताप होत नाही.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 159 ■ मंगळवार, दि. 20 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




ट्रोल झाल्यानंतर उर्वशी रौतेलाने मागितली सैफ अली खानची माफी
आतील पान

# पालकमंत्रिपदाच्या वाटपानंतर महायुतीत धूसफूस?



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : महायुतीच्या सरकारने शनिवारी (१८ जानेवारी) राज्यातील पालकमंत्र्यांची यादी जाहीर केली. मात्र, पालकमंत्री पदाच्या यादीतून काही मंत्र्यांना डावलण्यात आले. यामध्ये शिवसेना शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावले हे रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदासाठी आग्रही होते. मात्र, रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री पद हे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नेत्या तथा मंत्री आदिती तटकरे यांना देण्यात आले. त्यामुळे भरत गोगावले यांनी आपली नाराजी जाहीर बोलून दाखवली. तसेच भरत गोगावले यांना पालकमंत्री पद न दिल्यामुळे त्यांचे समर्थकही आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे पालकमंत्री पदाच्या वाटपानंतर महायुतीत धूसफूस सुरु झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.**

दरम्यान, भरत गोगावले यांच्या नाराजीसंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी प्रश्न विचारला. यावर बोलताना सुनील तटकरे यांनी म्हटले की, ''मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयाचा सर्वांनी सन्मान राखला पाहिजे. तसेच सर्वांच्याच मनाचे समाधान होईल असे नसते'', असे सूचक भाष्य सुनील तटकरे यांनी केले.

सुनील तटकरे काय म्हणाले?

भरत गोगावले यांच्या नाराजीसंदर्भात बोलताना सुनील तटकरे म्हणाले, ''ठीक आहे, शेवटी हा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेला आहे. सर्वांच्याच मनाचं समाधान होईल असं नसतं. त्यामुळे जो निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतलेला आहे. त्या निर्णयाचा आदर सर्वांनी राखलाच पाहिजे'', अशी प्रतिक्रिया सुनील तटकरे यांनी दिली.

भरत गोगावले काय म्हणाले?

पालकमंत्री पदाच्या यादीतून डावलण्यात आल्यानंतर भरत गोगावले यांनी म्हटले की, ''आमच्या सहाच्या सहा आमदारांनी (रायगडच्या) मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना कळवले होते. सर्वांना भेटी घेऊन सांगितले होते. त्यानंतर जिल्ह्यातही वातावरण झाले होते की भरत गोगावले हेच पालकमंत्री व्हावेत. मात्र, आता जे केले ते अनपेक्षित आहे. पण ठीक आहे. आमचे नेते एकनाथ शिंदे जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य करावा लागेल'', अशी प्रतिक्रिया भरत गोगावले यांनी दिली.

शिवसैनिकांनी संताप व्यक्त केला

पालकमंत्री पदासाठी भरत गोगावले यांना डावलून आदिती तटकरे यांना रायगडचे पालकमंत्री पद देण्यात आलं. त्यामुळे रायगडमधील शिवसैनिक संतप्त झाले. मुंबई गोवा महामार्गावर महाड जवळ रात्री उशिरा शिवसैनिकांनी रस्त्यावर टायर जाळून याचा निषेध केला. गोगावले यांचा जयजयकार करीत खासदार सुनील तटकरे यांचा निषेध करण्यात आला. शिवसैनिकांनी जवळपास २ तास महामार्ग रोखून धरला होता.





## वाद झाल्यानंतर हॉलतिकिटांवरुन काढून टाकले जातीचे उल्लेख!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** दहावी बारावीच्या परीक्षा काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. राज्य शिक्षण मंडळाच्या या परीक्षा करियरच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या मानल्या जातात. काही दिवसांपूर्वीच या परीक्षेच्या हॉलतिकीटांचे वाटप करण्यात आले होते. या हॉलतिकिटांवर विद्यार्थ्यांच्या नावासह त्यांच्या जातीचा सुद्धा उल्लेख केला होता. यावरून राज्य शिक्षण मंडळावर अनेकांनी टीका केली अखेर शिक्षण मंडळाने हा निर्णय रद्द केला आला आहे.

महाविद्यालयात राज्य शिक्षण मंडळाच्या फ ेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या १२ वीच्या परीक्षांच्या प्रवेशपत्रिकांचे वितरण सुरू झाले. त्यावर जातीचा उल्लेख केला गेला होता. त्यातच काही विद्यार्थ्यांच्या जातीची नोंद चुकीची असल्याचेही निदर्शनात आले. शाळेत प्रवेश घेताना जातीची चुकीची नोंद झाली असेल आणि पुढील प्रवेशासाठी विशिष्ट प्रवर्गातून प्रवेश घ्यायचा असेल तर जातीची योग्य नोंदणी आवश्यक असते. शाळेतील जातीची नोंद कळावी त्यामध्ये सुधारणा असल्यास शाळा सोडल्याचा दाखला घेताना त्यावर सुधारित जात यावी अशा उद्देशाने मंडळाने जातीचा उल्लेख केला होता. मात्र आता लोकभावनेचा आदर करत, तो मागे घेत असल्याचे स्पष्टीकरण राज्य शिक्षण मंडळाने दिले आहे. येत्या २३ तारखेपासून बारावीच्या विद्यार्थ्यांना नवीन हॉलतिकिटे ॲडमिट कार्डच्या लिंकद्वारे डाऊनलोड करता येईल. आणि १०वीच्या विद्यार्थ्यांना २० जानेवारीपासून हॉलतिकीट देण्यात येतील.

## सैफ अली खानवर चाकूहल्ला करणाऱ्याला पोलीस कोठडी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावर १६ जानेवारी रोजी मध्यरात्री चाकूहल्ला झाला. या प्रकरणात मुंबई पोलिसांनी मोहम्मद शरीफुल इस्लाम शेहजाद या ३० वर्षीय तरुणाला अटक केली आहे. न्यायदंडाधिकाऱ्यांनी मोहम्मदला पाच दिवसांची पोलीस कोठडी ठोठावली आहे.

सैफ अली खानवरील हल्ल्याचा आरोपी मोहम्मद शरीफुल इस्लाम शेहजाद याच्याकडे भारतीय असल्याचे ठोस पुरावे नाहीत. यामुळे तो बांगलादेशी असल्याचा असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केली. आरोपी बांगलादेशी असावा असा संशय निर्माण करणारे काही पुरावे पोलिसांनी जप्त केले आहेत. पण तपास सुरू असल्यामुळे या विषयावर अधिक माहिती देणे योग्य होणार नाही; असे मुंबई पोलिसांनी सांगितले. आरोपी भारतात विजय दास (बिजॉय दास) या नावाने वावरत होता. काही दिवस मुंबईत आणि नंतर मुंबई जवळच्या भागात तो वास्तव्यास होता. तो एका हाऊसकिपिंग कंपनीत बनावट कागदपत्रे दाखवून नोकरी करत होता.

आरोपीला पोलिसांनी ठाण्यातून पकडले. त्याने सैफवर हल्ला केल्याची कबुली दिली, असे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी आरोपीला मुंबईत आणले असून त्याची चौकशी सुरू आहे. पुढील काही तासांत आरोपीला न्यायदंडाधिकाऱ्यांपुढे हजर करुन पोलीस कोठडीची मागणी केली जाईल, अशी माहिती मुंबई पोलिसांनी दिली. आरोपीने चोरीच्या उद्देशानेच सैफच्या घरात घुसखोरी केली होती. पण घरात विरोध झाला आणि आरोपीने चाकूने हल्ला केला; असे प्राथमिक चौकशीतून लक्षात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

## मुंढव्यातील हुक्का पार्लरवर गुन्हे शाखेचा छापा; हॉटेल मालकासह व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा

**पुणे/प्रतिनिधी :** मुंढव्यातील एका हॉटेलम ध्ये सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी हुक्का पात्र आणि सुगंधी तंबाखू असा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी हॉटेल मालकासह व्यवस्थापकाविरुद्ध मुंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मुंढव्यात गुन्हे शाखेच्या युनिट पाचचे पथक गस्त घालत होते. या परिसरातील एका हॉटेलमध्ये बेकायदा हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती पोलीस कर्मचारी तानाजी देशमुख यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तेथे छापा टाकला. हॉटेलमधून हुक्का पात्र, सुगंधी तंबाखू असा सात हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी हॉटेल मालकासह, व्यवस्थापकाविरुद्ध सिगारेट आणि तंबाखूजन्य उत्पादने (महाराष्ट्र सुधारणा) सन १९१८ कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

## शरद पवार, ठाकरे गटाच्या म ाजी नगरसेवकांना स्वगृही परतण्याचे वेध; उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा

**पिंपरी/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केलेल्या भोसरी मतदारसंघातील माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांना पुन्हा स्वगृही परतण्याचे वेध लागले आहेत. या माजी नगरसेवकांनी चूक झाल्याचे सांगत राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा केली आहे. त्यामुळे या नगरसेवकांच्या प्रवेशावर लवकरच शिक्कामोर्तब होईल असे सूत्रांनी सांगितले. तसेच शिवसेना (ठाकरे) पक्षात असलेले माजी महापौर संजोग वाघेरे हेही अजित पवार यांच्या संपर्कात असल्याचे समजते.

महायुतीमध्ये भोसरीतून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी संधी मिळणार नसल्याचे लक्षात येताच राष्ट्रवादी काँग्रेसचे तत्कालीन शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी पक्षांतर केले. गव्हाणे यांच्यासह २५ माजी नगरसेवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला. गव्हाणे यांनी शरद पवार पक्षाकडून भोसरीतून विधानसभा निवडणूक लढविली. मात्र, त्यांचा पराभव झाला. विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचा दारुण पराभव झाला. तेव्हापासून या माजी नगरसेवकांमध्ये अस्वस्थतता निर्माण झाली आहे. त्यातच ज्यांच्या मार्गदर्शनाखाली या माजी नगरसेवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला ते माजी आमदार विलास लांडे यांनी शहराचा विकास उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यामुळे झाला आहे. पवार कार्यकर्त्यांना ताकद देतात. त्यामुळे अजित गव्हाणे यांच्यासह सर्व माजी नगरसेवकांनी अजित पवार यांच्यासोबत यावे, यासाठी मी विनंती करणार असल्याचे सांगितले. या माजी नगरसेवकांनीही अजित पवार यांच्यासोबत चर्चा केली.

## धारावीत बॉम्ब असल्याचा निनावी दूरध्वनी

**मुंबई/प्रतिनिधी :** धारावीत बॉम्ब असल्याचा निनावी दूरध्वनी मुंबई पोलिसांना आला आहे. धारावी पोलिसांनी त्याची गांभीर्याने दखल घेऊन गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

धारावीच्या राजीव गांधी नगरमध्ये बॉम्ब ठेवल्याचा निनावी दूरध्वनी मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला गुरूवारी प्राप्त झाला होता. त्यानंतर तातडीने याबाबतची माहिती स्थानिक पोलीस, गुन्हे शाखा यांना देण्यात आली. त्यांनी सर्व परिसरात तपासणी केली. त्यावेळी माहितीमध्ये तथ्य नसल्याचे निष्पन्न झाले. अखेर आरोपीविरोधात शनिवारी धारावी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता ३५३(१), ३५३(३) गुन्हा दाखल केला. शांतता भंग करण्यासाठी खोटी माहिती दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून धारावी पोलीस अधिक तपास करत आहेत. गेल्या वर्षभरात मुंबई पोलिसांना शंभरहून अधिक खोटी माहिती देणारे अथवा धमकीचे दूरध्वनी आले आहेत. त्यात मंत्रालयात बॉम्ब ठेवल्याचा निनावी दूरध्वनी ११२ क्रमांकाच्या हेल्पलाईनवर आला होता. निनावी दूरध्वनी करून आरोपीने मंत्रालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी दिली होती. निनावी दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीने मुख्यमंत्र्यांशी बोलणे करुन देण्याची इच्छा केली व्यक्त केली. बोलणे करुन दिले नाही तर बॉम्बद्वारे मंत्रालय उडवून देण्याची दिली धमकी दिली होती. त्यानंतर मंत्रालयात बॉम्बशोध पथक दाखल झाले.

## पोलीस दलात भरती होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तीन तरुणांचा दुर्दैवी अंत

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीड-परळी म ार्गावरती एका भीषण अपघातामध्ये तीन तरूणांचा दुर्दैवी अंत झाला आहे. पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरूणांना पहाटे व्यायाम करण्यासाठी गेले असता आज सकाळी (१९ जानेवारी) भरधाव एसटी बसने चिरडलं. या घटनेमध्ये तिघांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. हे तिनही तरुण पोलीस भरतीची तयारी करत होते. या घटनेने परिसरात मोठा संताप व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी जिल्हा रुग्णालयात धाव घेतली आहे. सुबोध बाबासाहेब मोरे (वय २०) , विराट बब्रूवान घोडके (वय १९) आणि ओम सुग्रीव घोडके (वय २०) या तीन तरूणांचा मृत्यू झाला आहे. पोलीस भरती करणाऱ्या ३ तरुणांच्या अपघातामुळे कुटूंबावरती दु:खाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेवरती बीड जिल्ह्याच्या भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी शोक व्यक्त केला आहे.

पंकजा मुंडेंनी व्यक्त केला शोक

पंकजा मुंडे यांनी त्यांच्या सोशल मिडिया एक्स अकाऊंटवरती पोस्ट शेअर करत दुःख व्यक्त केलं आहे. ''एका दुर्दैवी घटनेमुळे त्यांचं पोलीस व्हायचं स्वप्नं अधुरंच राहिलं..! अतिशय वेदनादायक घटना.. बीड जवळील घोडका राजुरी येथील पोलिस भरती चा सराव करताना ५ जणांना एसटी बसने चिरडल्याची दुर्दैवी घटना घडली. यामध्ये ३ जण जागीच ठार झाले असून २ जण गंभीर जखमी झाले आहेत. यामधील सुबोध बाबासाहेब मोरे (वय २०) , विराट बब्रूवान घोडके (वय १९) आणि ओम सुग्रीव घोडके (वय २०) हे तीन युवक होतकरू आणि सर्वसामान्य कुटुंबांतील होते. या युवकांच्या कुटुंबियांच्या दु:खात मी सहभागी आहे. जखमींच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी हीच ईश्वर चरणी प्रार्थना'', अशी पोस्ट त्यांनी शेअर केली आहे.

नेमका कसा घडला अपघात?

बीड-परळी महामार्गावरती आज (रविवारी) सकाळच्या सुमारास एसटी बसने व्यायामासाठी गेलेल्या तीन तरुणांना उडवलं. पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या या ३ तरुणांचा या घटनेमध्ये दुर्दैवी मृत्यू झाला आहे. हे तरुण नेहमीप्रमाणे पहाटे व्यायाम करण्यासाठी जात होते. यावेळी मागून भरधाव वेगात येणाऱ्या एसटी बसने तरुणांना जोरदार धडक दिली. घोडका राजुरी जवळ हा अपडात झाला.

घटनेची माहिती मिळताच तरुणांना जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. तरुणांच्या नातेवाईकांनी तात्काळ जिल्हा रुग्णालयात धाव घेतली आहे. अपघात नेमका कशामुळे झाला याचा तपास सुरु आहे. परळी म हामार्गावर झालेल्या अपघातात बस सिम ेंटच्या रस्त्यावरून खाली घसरली असून बसचा मागच्या काचा फुटल्या आहेत. या बसमध्ये प्रवासी होते का याबाबत अद्याप माहिती मिळू शकली नसून नेमका कशाने अपघात झाला? याचा तपास पोलीस करत आहेत.

## तर मुख्यमंत्र्यांचा सामना आमच्याशी, राज्य बंद करू; मनोज जरांगे पाटलांचा जनआक्रोश मोर्चातून इशारा

**मुंबई/प्रतिनिधी :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राज्यामध्ये जन आक्रोश मोर्चे सुरूच आहेत. आज (१९ जानवोरी) छत्रपती संभाजी नगरमध्ये संतोष देशमुख आणि परभणीचे सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय देण्यासाठी जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चातून मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला कडक इशारा दिला. धनंजय मुंडे यांच्यावर सुद्धा घणाघाती प्रहार केला. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांच्या कुटुंबाशी पाठीशी भरणार असल्याचे जरांगे पाटील म्हणाले. परभणीमधील सोम नाथ सूर्यवंशी कुटुंबीयांच्या सुद्धा पाठीशी उभे राहणार असल्याचे जरांगे पाटील यांनी सांगितलं. देशमुख हत्या प्रकरणात फार मोठं नेटवर्क असून खंडणी, खून, पैसा पुरवणारे, त्यांना लपवणारे, डाके टाकणारे,बलात्कार, छेडछाड करणाऱ्या यांच्या टीम असल्याचे ते म्हणाले. ज्यांनी खून करायला पाठवले, सामूहिक कट रचणारा सगळ्यात मोठा गुन्हेगार असल्याचेही ते म्हणाले.



आरोपी सुटतील असं आम्हाला वाटेल त्या दिवशी राज्य बंद करू

जरांगे पाटील म्हणाले की मुख्यमंत्र्यांनी शब्द दिल्याने लोक शांत आहेत. यातील एकही जण सुटला तर मुख्यमंत्र्यांचा सामना आमच्याशी असल्याचा इशारा जरांगे पाटील यांना दिला. खंडणी आणि खून करणाऱ्यांना सांभाळलं कुणी? हे चार्जशीटमध्ये आलंच पाहिजे, अशी मागणी सुद्धा त्यांनी केली. ज्या दिवशी आरोपी सुटतील असं आम्हाला वाटेल त्या दिवशी राज्य बंद करू, असा इशारा पाटील यांनी जन आक्रोश मोर्चातून दिला. समोरचा डाव टाकतो ते ओळखायला शिका. देशमुख कुटुंबाला आलेली वेळ ही राज्यात कोणावरही येऊ नये. आज देशमुख कुटुंबावर वनवास आला आहे. हे पुढील काळात होऊ द्यायचे नसेल, तर तर धनंजय मुंडेंच्या टोळ्या संपवा असे ते म्हणाले. धनंजय मुंडेंची त्यांच्या लोकांना मूक संमती असल्याचार आरोपही त्यांनी केला एकदा मराठा बिथरला तर तुझी टोळी चटणीला देखील उरणार नाही असा इशारा सुद्धा जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांना दिला.

# मुंबईकरांना बेस्ट चा दणका, १५ टक्क्यांनी वीज महागणार, नवीन दरवाढ एप्रिलपासून लागू होणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईकरांसाठी एक महत्वाची बातमी समोर आली आहे. बेस्टने वीज ग्राहकांना नवीन वर्षात दरवाढीची भेट दिली आहे. याचा फटका मुंबई शहरासह पूर्व आणि पश्चिम उपनगरातील ग्राहकांना बसणार आहे. बेस्ट, टाटा पॉवर आणि अदानी इलेक्ट्रिसिटी यांनी वीज नियामक आयोगाकडे पुढील पाच वर्षासाठीचे दरवाढीचे प्रस्ताव दाखल केले आहेत. त्यानंतर बेस्टने १५ टक्के दरवाढ सुचविल्यानं बेस्टच्या ग्राहकांना नव्या वर्षातच लाइट बिल जादा येणार आहे.





टाटा आणि अदानी यांनी एका वर्षापुरता ग्राहकांना दिलासा दिला असला तरी पुढील वर्षापासून या दोन्ही वीजपुरवठादार कंपन्यांच्या ग्राहकांचा लाइट बिलाचा आकडा वाढणार आहे. तीनही कंपन्यांचे नवे वीजदर मार्चमध्ये जाहीर होऊन एप्रिलमध्ये लागू होणार आहे.

वीज कंपन्यांची प्रत्येकी पाच वर्षांनी वीज दर निश्चिती होते

दरम्यान, वीज कंपन्यांची प्रत्येकी पाच वर्षांनी वीज दर निश्चिती होते. त्याला मल्टी इयर टेरिफ असे म्हणतात. पाचवे वर्ष संपत आले की वीज कंपन्या निर्मिती, वितरण, पारेषण खर्चानुसार महसुली गरज पूर्ण करण्यासाठी वीजदर याचिका आयोगाकडे दाखल करतात. ग्राहकांना दरवाढीच्या प्रस्तावांवर १० फ ेब्रुवारीपर्यंत सूचना आणि हरकती दाखल करता येणार आहेत. २०२५-२६ मध्ये ग्राहकांना सरासरी १५ टक्के दर कपातीचा फायदा मिळेल. तर हरित ऊर्जादरांमध्ये ५० टक्के कपातीचा प्रस्ताव आहे. हे दर प्रति युनिट मागे ६६ पैशांवरून ३० पैसे कमी होतील, असे अदानी इलेक्ट्रिसिटीने सांगितले. बेस्ट आणि टाटा चेंबूरच्या वीज निर्मिती केंद्रातून वीज घेतात. ही वीज खूप महाग आहे. मुंबईकरांना कमी दरात वीज द्यायची असेल तर मुंबईबाहेरून स्वस्तात वीज आणावी लागेल. मात्र म ुंबईत वीज आणणाऱ्या वाहिन्यांची क्षमता संपली आहे. ही क्षमता वाढवल्याशिवाय बाहेरुन वीज मुंबईत आणता येणार नाही आणि त्याशिवाय विजेचे दर कमी करता येणार नाहीत.

सध्या वीज कंपन्यांचे दर किती?

अदानी इलेक्ट्रिसिटी

| युनिट | आता | नंतर |
|---|---|---|
| ० ते १०० | ३.८० | ३.४५ |
| १०१ ते ३०० | ६.५० | ५.९५ |
| ३०१ ते ५०० | ८.५० | ६.९० |
| ५०१ हून अधिक | ९.८० | ६.९० |

टाटा पॉवर

| युनिट | आता | नंतर |
|---|---|---|
| ० ते १०० | २.१८ | २.१५ |
| १०१ ते ३०० | ५.३६ | ५.३५ |
| ३०१ ते ५०० | ११.६२ | ९.२० |
| ५०१ हून अधिक | १२.५६ | १०.५० |

बेस्ट

| युनिट | किती दरवाढ |
|---|---|
| ० ते १०० | २ |
| १०१ ते ३०० | ५.५५ |
| ३०१ ते ५०० | ९.४५ |
| ५०१ हून अधिक | ११.५५ |

# जिल्हानिहाय ध्वजारोहण करणाऱ्या मंत्र्यांची यादी जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी २०२५ रोजी ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी सकाळी ९.१५ वाजता आयोजित करण्यात येणार आहे. या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे यासाठी या दिवशी सकाळी ८.३० ते १० या दरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्ध शासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये, असे राजशिष्टाचार विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

मुंबई येथील मुख्य शासकीय समारंभात राज्यपाल यांच्या हस्ते व मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शिवाजी पार्क दादर मुंबई येथे ध्वजारोहण व समारंभपूर्वक संचलन कार्यक्रम होईल. विभागीय आणि जिल्हा स्तरावर पुढे दर्शविल्याप्रमाणे मंत्री अथवा राज्यमंत्री ध्वजारोहण करतील.

ठाणे - उपमुख्यमंत्री एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे, पुणे - उपमुख्यमंत्री अजित आशाताई अनंतराव पवार, नागपूर - मंत्री सर्वश्री चंद्रशेखर प्रभावती कृष्णराव बावनकुळे, अहिल्यानगर - राधाकृष्ण सिंधुताई एकनाथराव विखे पाटील, वाशिम - हसन सकीना मियालाल मुश्रीफ, सांगली - चंद्रकांत (दादा) सरस्वती बच्चू पाटील, नाशिक- गिरीश गीता दत्तात्रय महाजन, पालघर- गणेश सुभद्रा रामचंद्र नाईक, जळगाव- गुलाबराव रेवाबाई रघुनाथ पाटील, यवतमाळ- संजय प्रमिला दुलीचंद राठोड, मुंबई शहर- मंगलप्रभात प्रेमकवर गुमनमल लोढा, मुंबई उपनगर- ड.आशिष मीनल बाबाजी शेलार, रत्नागिरी- उदय स्वरूपा रवींद्र सामंत, धुळे- जयकुमार नयनकुवर जितेंद्रसिंह रावल, जालना- श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे, नांदेड- अतुल लीलावती मोरेश्र्वर सावे, चंद्रपूर- अशोक जनाबाई रामाजी उईके, सातारा- शंभुराज विजया देवी शिवाजीराव देसाई, बीड- दत्तात्रय गिरीजाबाई विठोबा भरणे, रायगड- आदिती वरदा सुनील तटकरे, लातूर- शिवेंद्रसिंह अरुणाराजे अभयसिंहराजे भोसले, नंदुरबार- ॲड माणिकराव सरस्वती शिवाजी कोकाटे, सोलापूर- जयकुमार कमल भगवानराव गोरे, हिंगोली- नरहरी सावित्रीबाई सिताराम झिरवाळ, भंडारा- संजय सुशीला वामन सावकारे, छत्रपती संभाजीनगर संजय शकुंतला पांडुरंग शिरसाट, धाराशिव- प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक, बुलढाणा- मकरंद सुमन लक्ष्मणराव जाधव (पाटील), सिंधुदुर्ग- नितेश नीलम नारायण राणे, अकोला- आकाश सुनिता पांडुरंग फुंडकर, गोंदिया- बाबासाहेब शांताबाई मोहनराव पाटील, कोल्हापूर- प्रकाश सुशीला आनंदराव आबिटकर, गडचिरोली- ड. आशिष उमादेवी नंदकिशोर जयस्वाल, वर्धा- पंकज कांचन राजेश भोयर, परभणी- श्रीमती मेघना दीपक साकोरे - बोर्डीकर आणि अमरावती- इंद्रनील अनिता मनोहर नाईक.

## भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनी सकाळी ९.१५ वाजता मुख्य शासकीय समारंभ

राष्ट्रध्वजारोहण करणारे मंत्री अथवा राज्यमंत्री काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रम स्थळी उपस्थित राहू न शकल्यास विभागीय मुख्यालयी विभागीय आयुक्तांनी आणि जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकारी यांनी तसेच इतर विभागीय व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी अनुक्रमे संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी ध्वजारोहण करतील. संबंधित प्रांत अधिकारी व तहसीलदार हे अनुक्रमे जिल्हा उपविभागीय व तालुका मुख्यालयी ध्वजारोहण समारंभाच्या ठिकाणी शासकीय कार्यक्रमांचे अध्यक्षस्थान स्वीकारतील.

राज्यात वरील दिवशी सर्व शासकीय व सार्वजनिक इमारतींवर, किल्ल्यांवर तसेच जिल्ह्यांमध्ये ऐतिहासिक महत्त्वाच्या ठिकाणी राष्ट्रध्वज उभारण्यात यावेत, असेही कळविण्यात आले आहे.

राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पद्धतीबाबत शासन परिपत्रक क्रमांक एफएलजी-१०९१/३०, दिनांक २ मार्च १९९१ तसेच क्रमांक एफएलजी १०९१(२)/३०, दिनांक ५ डिसेंबर १०९१ तसेच क्रमांक एफएलजी १०९८/ ध्वजसंहिता/३०, दिनांक ११ मार्च १०९८ अन्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. याप्रसंगी सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित रहावे. तसेच उत्सव अथवा औपचारिक प्रसंगी परिधान करावयाचा राष्ट्रीय पोशाख प्रजासत्ताक दिन समारंभप्रसंगी उपस्थित राहणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांनी व व्यक्तींनी परिधान करावा. स्थानिक लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्यसैनिक, शहीद जवानांच्या पत्नींना व आई- वडील यांना समारंभास निमंत्रित करावे. अधिकाधिक नागरिकांना हा सोहळा घरबसल्या पाहता यावा यासाठी वेबसाईटद्वारे थेट प्रक्षेपण करण्याचा प्रयत्न करावा, अशा सूचना या परिपत्रकाद्वारे देण्यात आल्या आहेत.

## चॅम्पियन ट्रॉफी साठी संतुलित संघ निवड

पुढील महिन्यात १९ फेब्रुवारी ते ९ मार्च या कालावधीत पाकिस्तान आणि दुबई येथे एकदिवसीय सामन्यांची चॅम्पियन ट्रॉफी स्पर्धा होणार असून या स्पर्धेसाठी निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर व कर्णधार रोहित शर्मा यांनी यांनी १८ तारखेला १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. या संघात रोहित शर्मा व युवा शुभमन गिल हे भारताचे अनुभवी आणि युवा खेळाडू भारताच्या डावाची सुरवात करतील. विशेष म्हणजे हे दोघे या संघाचे कर्णधार आणि उपकर्णधार आहेत यांच्यासोबत तिसरा सलामीवीर म्हणून यशस्वी जयस्वाल ची निवड करण्यात आलेली आहे. मधल्या फळीची जबाबदारी अनुभवी विराट कोहली, , श्रेयस अय्यर, के एल राहुल तसेच यष्टीरक्षक ऋषभ पंत यांच्यावर टाकण्यात आली आहे अनुभवी के एल राहुल हा अतिरिक्त यष्टीरक्षक म्हणूनही जबाबदारी पार पाडेल. विशेष म्हणजे दोघेही उत्तम फिनिशर म्हणून आपली जबाबदारी पार पाडतात. भारताची फलंदाजी अतिशय बलवान असून रोहित, शुभमन व विराट हे पहिल्या तीन क्रमांकाचे फलंदाज जगातील सर्वोत्तम फलंदाज मानले जातात. एकदिवसीय सामन्यात या तिघांची कामगिरी उत्तम असून तिघेही एकदिवसीय सामन्यातील श्रेष्ठ फलंदाज समजले जातात. भारतात झालेल्या एकदिवसीय विश्र्वचषकात तसेच मागील वर्षी वेस्ट इंडिज मध्ये झालेल्या टी २० विश्र्वचषकात तिघांनीही चांगली कामगिरी केली आहे. या तिघांची कसोटीतील कामगिरी त्यांच्या लैकिकास साजेशी झालेली नाही त्यामुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठली असली तरी मर्यादित षटकांच्या सामन्यात त्यांची कामगिरी नजरेत भरणारी आहे. सध्या जरी ते त्यांच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये नसतील तरी ते या स्पर्धेत पुन्हा आपल्या पूर्वीच्या फॉर्ममध्ये येऊ शकतात ते जर पुन्हा फॉर्मात आले तर चॅम्पियन ट्रॉफी जिंकण्याच्या भारताच्या आशा पल्लवित होतील. चौथ्या क्रमांकावर युवा श्रेयस अय्यर येईल. भारताचा तो भरवशाचा फलंदाज असून एकदिवसीय विश्र्वचषक स्पर्धेत त्याने पाचशे पेक्षा अधिक धावा काढल्या आहेत. तो फ्लॉप गेला तर त्याची जागा के एल राहुल घेईल. तो मैदानात सर्वत्र फटकेबाजी करू शकतो. तोही भारताचा भरवशाचा फलंदाज मानला जातो. त्यानंतर ऋषभ पंत हा धडाकेबाज यष्टीरक्षक फलंदाज मैदानात येईल. तो स्फोटक फलंदाज असून मॅच फिनिशर आहेत. कमी चेंडूत जास्त धावा काढून संघाला विजय मिळवून देण्यात त्याचा हातखंडा आहे. त्यानंतर हार्दिक पांड्या हा जगातील सध्याचा सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू येईल. तो गोलंदाजी, तडाखेबंद फलंदाजी आणि प्रभावी क्षेत्ररक्षण करून संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावतो. त्याने आपल्या अष्टपैलू खेळीने भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. वॉशिंग्टन सुंदर हा आणखी एक अष्टपैलू खेळाडू भारतीय संघात आहे. ऑफस्पिन गोलंदाजी आणि तडाखेबंद फलंदाजी हे त्याचे वैशिष्ट्ये आहे. गोलंदाजीमध्ये निवड समितीने तीन फिरकी गोलंदाजांना संधी दिली असून अनुभवी रवींद्र जडेजा सोबत फॉर्मात असलेला चायनामन गोलंदाज कुलदीप यादव आणि लेफ्ट आर्म स्पिनर अक्षर पटेल यांना संधी मिळाली आहे. तिघेही डावखुरे मंदगती गोलंदाज आहेत त्यामुळे मंदगती गोलंदाजीत विविधता नसल्याची टीका टीकाकार करीत असले तरी तिघेही फॉर्ममध्ये आहे. जडेजा हा भारताचा सर्वोत्तम मंदगती गोलंदाज आहे शिवाय तो फलंदाजीही करतो आणि चांगला क्षेत्ररक्षक आहे म्हणजे तो एक उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू आहे. कुलदीप यादव जरी डावखुरा असला तरी तो चायनामन गोलंदाज आहे आणि विशेष म्हणजे तो फॉर्ममध्ये आहे. फॉर्ममध्ये असलेल्या खेळाडूला संधी देणे केंव्हाही चांगले. अक्षर पटेल गोलंदाजीसोबत फलंदाजीही करू शकतो त्याची फलंदाजी भारतासाठी बोनस ठरेल. जसप्रीत बुमराह व मोहम्मद शमी या अनुभवी वेगवान गोलंदाजांसोबत अर्शदिप सिंग या युवा गोलंदाजाला देखील निवड समितीने संधी दिली आहे. निवड समितीने या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाला संधी देऊन वेगवान गोलंदाजीत विविधता आणण्याचा प्रयत्न केला आहे. मर्यादित षटकांच्या सामन्यात डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाचे महत्व अनन्यसाधारण आहे. २०११ साली झहीर खान या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाने अप्रतिम कामगिरी करून भारताला विश्र्वचषक मिळवून दिला होता इतकेच नाही तर मागील वर्षी भारताने जिंकलेल्या टी २० विश्र्वचषक स्पर्धेत अर्शदीप सिंगनेच सर्वाधिक बळी मिळवले होते. डावाच्या शेवटी म्हणजे डेथ ओव्हरमध्ये अर्शदिप सिंगची गोलंदाजी प्रभावी ठरते. निवड समितीने निवडलेला हा संघ चांगला आहे. जुन्या आणि नव्या खेळाडूंना संधी देत जोश आणि होश यांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न निवड समितीने केला आहे त्यात ते बऱ्यापैकी यशस्वीही ठरले आहेत. चॅम्पियन ट्रॉफिसाठी निवडण्यात आलेला हा संघ संतुलित आहे हे मान्य करून नीवड समितीचे याबाबत अभिनंदन करावे लागेल. आता जबाबदारी आहे ती निवडण्यात आलेल्या या १५ खेळाडूंची. २०१३ नंतर भारताला चॅम्पियन ट्रॉफीवर नाव कोरण्यात अपयश आले आहे. हे अपयश झटकून नव्याने सुरवात करण्याची संधी या निमित्ताने या संघाला मिळणार आहे. १९९८ साली सुरू झालेली ही स्पर्धा भारताने २००२ आणि २०१३ साली जिंकली होती तर २०१७ साली भारत या स्पर्धेचा उपविजेता होता. या स्पर्धेसाठी निवड झालेले सर्व खेळाडू अनुभवी आहेत. एकदिवसीय सामने खेळण्याचा सर्वांना मोठा अनुभव आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ही स्पर्धा पाकिस्तानात होणार असली तरी भारताचे सर्व सामने दुबईत होणार आहे. संघात निवड झालेल्या सर्व खेळाडूंना दुबईत खेळण्याचा चांगला अनुभव आहे त्यामुळे देशासाठी सर्वोत्तम कामगिरी करून भारताला १२ वर्षांनंतर चॅम्पियन ट्रॉफी जिंकून देण्याची जबाबदारी ते यशस्वीपणे पार पाडतील अशी आशा करूया. भारतीय संघाला एकदिवसीय चॅम्पियन ट्रॉफी स्पर्धेसाठी मनापासून शुभेच्छा!

## विनापरवाना वृक्षतोड; ऊर्जा कंपनीला दंड

**सांगली/प्रतिनिधी :** शिरसगाव (ता. कडेगाव) येथे सौर ऊर्जा प्रकल्पासाठी २६८ झाडांची विनापरवाना तोड केल्याप्रकरणी आवाडा ऊर्जा कंपनीला २ लाख ६८ हजाराचा दंड वन विभागाकडून ठोठावण्यात आल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष शिरशेटवार यांनी दिली.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पासाठी शिरसगाव येथील जमीन देण्यात आली आहे. प्रकल्पासाठी अडथळा ठरणारी झाडे तोडण्यासाठी महावितरण व आवाडा एनर्जी या कंपनीसाठी ८०५ मिश्र प्रजातीच्या झाडांचे मूल्यांकन करण्यात आले. मूल्यांकन करण्यात आलेल्या झाडांपैकी ४६६ झाडे तोडण्याची परवानगी देण्यात आली होती. मात्र, कंपनीकडून जादा झाडे तोडण्यात आल्याची तक्रारी संतोष मांडके यांनी वनविभागाकडे केली.

## मुख्यमंत्र्यांना सत्तेचा माज, बीड आणि परभणी प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवा : आनंदराज आंबेडकर

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** सोमनाथ सूर्यवंशीच्या अंगावर काळे-निळे वण होते, त्याला मारहाण झाल्यामुळेच कोठडीत मृत्यू झाला होता हे स्पष्ट असतानाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर विधानसभेत हास्यास्पद निवेदन दिले. त्यांना सत्तेचा माज आला आहे अशी टीका आनंदराज आंबेडकर यांनी केली. बीड आणि परभणी हत्या प्रकरण हे फास्ट ट्रॅक कोर्टात चालवले पाहिजे अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. आनंदराज आंबेडकर हे छत्रपती संभाजीनगरमध्ये माध्यमांशी संवाद साधत होते.

राज्यात कायद्याचे राज्य राहिलेले आहे की नाही हा प्रश्न उपस्थित झालेला आहे. सोमनाथ सूर्यवंशी याच्या अंगावर काळे निळे वण होते आणि मुख्यमंर्त्यांनी त्यावर विधानसभेत हास्यास्पद निवेदन केले. मुख्यमंर्त्यांना असे उत्तर द्यायला त्यांना सत्तेचा माज आला आहे. या सरकारचे काय करायचे हे अजूनही आम्हाला समजत नाही.

बीडमध्ये प्रतिमोर्चे काढण्याचे काम थांबले पाहिजे असे सांगत आनंदराज आंबेडकर म्हणाले की, ''संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी या दोन्हीही प्रकरणाची हायकोर्टाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या मध्यमातून चौकशी करा अशी आमची मागणी आहे. ही दोन्हीही प्रकरणे फास्टट्रॅक कोर्टमध्ये संभाजीनगर येथे चालवावेत, जेणेकरून दबाव येणार नाही.''

सैफवर हल्ला झाला मग राज्यात सुरक्षित कोण आहे? असा प्रश्न आनंदराज आंबेडकर यांनी विचारला. राज्यात पूर्णवेळ गृहमंत्री व्हावा, जेणेकरून अशी प्रकरणे होणार नाहीत अशीही मागणी त्यांनी केली.

बीडमध्ये कोंबिंग ऑपरेशन करून आरोपी का पकडले नाहीत? तुमच्यातील चोरलफंगे चांगले आणि विरोधातील लोक वाईट हे योग्य नाही. महाराष्ट्रात असंतोषाचा उद्रेक होऊ देऊ नका. असंतोषाचा उद्रेक झाला तर संख्याबळ असलेलं तुमचं सरकार कुठे गडप होईल याचा पत्ता लागणार नाही असा इशारा आनंदराज आंबेडकर यांनी दिला.


दरम्यान, धनंजय मुंडे यांनी बीड प्रकरणी प्रतिक्रिया दिली. जे लोक आरोप करत आहेत त्यांनी पुरावे दाखवावे. बीड प्रकरणावर योग्यवेळी बोलणार असे मंत्री धनंजय मुंडेंनी म्हटलेय. मला काय बदनाम करायचे ते करा, पण बीड जिल्ह्याला नको असे आवाहनही मुंडेंनी केले.

बीडमधील परिस्थितीमुळे धनंजय मुंडेंना पालकमंत्रिपदापासून दूर राहवे लागले आहे. बीडचे पालकत्व उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे असणार आहे. बीडमधील परिस्थितीमुळेच अजित पवारांना पालकमंत्रिपद घेण्याची विनंती आपणच केल्याचं धनंजय मुंडेंनी सांगितले. तसचे बीडच्या परिस्थितीमुळे आपणच पालकमंत्रिपदाची जबाबदारी नकारल्याचे धनंजय मुंडेंनी यावेळी स्पष्ट केले.

## लोकसभेचा निकाल बघून अजितदादा अन् मी एकमेकांचा चेहराच पाहत बसलो होतो, प्रफुल पटेलांनी सांगितला 'तो' किस्सा

दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी :** लोकसभेच्या निकालानंतर विधानसभा निवडणुकीला सामोरे कसे जायचे, हा प्रश्न होता. मात्र, चार ते पाच महिन्यात आपण मेहनत केली. एका मोठ्या पराभवाला तोंड देऊन मोठा विजय प्राप्त केला, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल पटेल यांनी केले. ते रविवारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिर्डीत आयोजित करण्यात आलेल्या नवसंकल्प शिबिरात बोलत होते. यावेळी प्रफुल पटेल यांनी विविध मुद्द्यांवर सविस्तरपणे भाष्य केले.



देशात मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान बनले. त्यात महाराष्ट्राचा आणि राष्ट्रवादीचा हिस्सा काय? हा प्रश्न उपस्थित होतो. लोकसभा निवडणुकीच्या निकाला वेळी मी आणि अजित पवार देवगिरीला बसून टीव्ही पाहत होतो. आम्ही एकमेकांचा चेहरा पाहत होतो. आपल्याला खचायचं नाही हे ठरवलं आणि कामाला लागलो. बारामती निकालावरून आपण काही चूक केली आहे का? महाराष्ट्राने आपल्याला नाकारलं आहे का? हा विचार मनात येत होता. कदाचित तोच क्षण एक मोठा विजय खेचून आणण्याचा भाग होता. महायुती म्हणून आपण निवडणुकीला सामोरे गेलो. पाच सहा महिन्यात परिवर्तन होईल, असा निकाल प्राप्त केल्याचे प्रफुल पटेल यांनी म्हटले.

मी आमदारांचे देखील आभार मानतो. कारण त्यावेळी ४२ आमदारांनी अजित पवारांना साथ दिली. पक्षाच्या चिन्हावर उभे राहिले आणि निवडून देखील आले. १९९१ ला अजित पवार आणि मी पंजावर निवडून गेलो. अजूनही ९० टक्के लोक हे काँग्रेस विचारातून आलेलो आहे. आपली तीच विचारधारा आहे. आपण रातोरात लोकाची विचारधारा बदलू शकत नाही. आम्ही पहिल्यांदा मोदींना भेटलो त्यावेळी आम्ही बोललो की, शिव-शाहू-फुले आंबेडकर हीच आमची विचारधार आहे. त्यांनी देखील तुम्ही यावर ठाम राहा, असे सांगितले.

काँग्रेस पक्ष आता हळूहळू महाराष्ट्रात कमी होऊ लागला आहे. आपल्याला ती पोकळी भरता येणार आहे. त्यांच्यातील अनेकांची अजित पवारांकडे येण्याची इच्छा आहे. अजित पवार तुम्हाला विनंती आहे पुण्यात एका चौकात बसून कार्यकर्ता नोंदणी करा. आम्हीदेखील ठिकठिकाणी बसतो आणि नोंदणी करून घेतो. १९९९ साली माझी वैयक्तिक इच्छा वेगळी होती. त्यावेळी आपल्या सर्वांनी काँग्रेस सोबत जाण्याची इच्छा व्यक्त केली. आपण सोपा मार्ग निवडला आणि काँग्रेस सोबत सत्तेत सहभागी झालो. त्यावेळी अटल बिहारी वाजपेयी यांनी ऑफर दिली होती की तुम्ही भाजप आणि शिवसेने सोबत आपण सत्तेत सहभागी व्हा आणि केंद्रात देखील एनडीए सोबत सहभागी व्हा. त्यावेळी हा निर्णय घेतला असता तर काँग्रेस कधीच संपून गेलं असती. परंतु मोठ्या वडाच्या झाडाखाली गेलो. त्यामुळे आपण मोठे होऊ शकलो नाही. परंतु आता काही कारणास्तव मोकळा श्वास घेतला आहे. त्यामुळे आपण आपला पक्ष वाढवूयात, असे प्रफुल पटेल यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना सांगितले.

# मराठी बंधु-भगिनींचे प्रेम अनमोल, मला या प्रेमातच राहायचे आहे! - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

स्वित्झर्लंड, : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे झ्युरिक, स्वित्झर्लंड येथे बृहन महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंडतर्फे उत्साहात स्वागत करण्यात आले. या स्वागत समारंभात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी वैश्र्विक मराठी परिवारातील आपल्या मराठी बंधु-भगिनींशी मनमोकळा संवाद साधला.

बृहन महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंडच्या प्रेमाचे मोल नाही, मला या प्रेमातच राहायचे आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले की, आपला महाराष्ट्र भारताचे पॉवर हाऊस असून देश ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था झाल्यानंतर एक ते दोन वर्षांतच महाराष्ट्र पहिली उपराष्ट्रीय ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था होईल. एआय तंत्रज्ञानात आघाडी घेतलेला महाराष्ट्र





भारताचे डेटा सेंटर कॅपिटल असल्याचे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात इनोव्हेशन सिटी तयार करणार असल्याचे सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला देव, देश, धर्माकरता लढायला शिकवले, आपल्या संस्कृतीचा, भाषेचा अभिमान बाळगायला शिकवले, ती शिकवण मराठी माणसाने स्वित्झर्लंडमध्येही जपली आणि पुढच्या पिढीलाही दिली, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला असून मराठीला ज्ञानभाषा म्हणून प्रस्थापित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. यासाठी स्वित्झर्लंडसह वैश्र्विक मराठी परिवारातील मराठी बंधु-भगिनी आमचे राजदूत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

याप्रसंगी बृहन महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंडचे अध्यक्ष अमोल सावरकर, सेक्रेटरी किर्तीताई गद्रे, महेश बिरादार व इतर मान्यवर उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### जन आक्रोश मोर्चामध्ये स्वर्गीय संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांचे कुटुंब सहभागी



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** स्वर्गीय संतोष देशमुख व सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा व्हावी त्यांना न्याय मिळावा यासाठी आज छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौकातून मोर्चाला सुरुवात झाली. यावेळी स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबीय व सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या पायाशी पुष्पहार घालून मोर्चाला सुरुवात केली. यावेळी धनंजय देशमुख म्हणाले ज्या अमानुषपणे हत्या केले आहे त्यात मध्ये जे दोषी आरोपी आहे त्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे आम्हाला न्याय मिळाला पाहिजे आणि आम्ही न्याय मिळेपर्यंत शांत बसणार नाही असे यावेळी धनंजय देशमुख म्हणाले.

### राज्य पोस्टल विभागाचा आरोग्यासाठी ई सायकल रॅलीमधून अनोखा संदेश



दैनिक आपला विदर्भ

**बारामती/प्रतिनिधी :**महाराष्ट्र राज्य पोस्टल विभागाचा आरोग्यासाठी ई सायकल रॅलीमधून अनोखा संदेश देण्यात आलाय. छत्रपती संभाजीनगर येथून ही ई सायकल रॅलीला सुरवात झालीय. बारामती मधून ही ई सायकल रॅली पोस्टल विभागात आलीय. यावेळी बारामती हेड पोस्ट ऑफिस, बारामती येथे डाक चौपाल देखील आयोजित केलंय. ज्यामध्ये सार्वजनिक सभासदांसाठी एक फिलाटेलिक प्रदर्शन देखील आयोजित केले आहे. छत्रपती संभाजीनगर येथून निघालेली ई सायकल रॅलीचा प्रस्तावित मार्ग बारामती मयुरेश्र्वर गणपती मंदिर, जेजुरी देवस्थान, संत सोपानदेव महाराज समाधी, पुरंदर किल्ला असा असणार आहे. या प्रसंगी बारामती हेड पोस्ट ऑफिस, बारामती येथे डाक चौपाल देखील आयोजित केले आहे ज्यामध्ये सार्वजनिक सभासदांसाठी एक फिलाटेलिक प्रदर्शन देखील आयोजित केले आहे.ई सायकल रॅली ही मुंबईत गेट ऑफ इंडिया येथे जाऊन सांगता होणार आहे.

### मुकेश अंबानींच्या रिलायन्सची क्रिप्टोमध्ये एन्ट्री? जिओ कॉइनची चर्चा जोरात

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** कमी वेळात जास्त नफा मिळवून देण्यासाठी जगभरातील गुंतवणूकदार क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणूक करतात. यातील गुंतवणूक खूपच जोखमीची असते. क्रिप्टोतील गुंतवणूक भारतात कायदेशीर नाही. असे असले तरी अनेक भारतीयांना याबद्दल उत्सुकता असते. अनेकजण याबद्दल संशोधन करताना दिसतात. आशिया आणि भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांच्या नेतृत्वाखालील जिओ प्लॅटफॉर्म क्रिप्टोमध्ये एन्ट्री करणार का? अशा चर्चा वेगाने पसरु लागल्या आहेत. जिओने अलीकडेच इंटरनेट तंत्रज्ञान कंपनी पॉलीगॉन लॅब्ससोबत भागीदारीची घोषणा केली. अंबानींच्या टेलिकॉम कंपनीने हे जाहीर केल्यापासून व्दण्दग्ह ने इंटरनेटवर धुमाकूळ घातला आहे. जिओ कॉइनचे यूजर्स त्याचे स्क्रीनशॉट शेअर करत आहेत. अनेक यूजर्स ट्विटरवर व्दण्दग्ह चे फोटो शेअर, रिट्वीट करताना दिसतायत. असे असले तरी जिओ कंपनीने याबद्दल कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. बिटनिंगचे सीईओ काशिफ रझा यांनीही यासंदर्भातील पोस्ट शेअर केली होती. जिओकॉइनचा वापर म ोबाईल रिचार्ज किंवा रिलायन्स गॅस स्टेशनवर खरेदीसारख्या सेवांसाठी केला जाऊ शकतो, असा अंदाज लावला जातोय. जिओने पॉलीगॉन लॅब्ससोबत भागीदारी केल्यानंतर बाजारात विविध चर्चा सुरु झाल्या. ब्लॉकचेन आणि वेब ३ क्षमतांसह त्यांच्या ऑफरिंग्ज वाढवणे हा यामागचा उद्देश आहे. असे असले तरी अंबानींच्या नेतृत्वाखालील रिलायन्स जिओकडून जिओ कॉइन किंवा त्याच्या वापराबद्दल कोणतेही अधिकृत माहिती दिलेली नाही.


# ६८ लाखांच्या गैरव्यवहारांसह ५० अकाउंटवरुन १३ कोटी रुपयांची उलाढाल

## सायबर फ्रॉड करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीला पुणे पोलिसांनी ठोकल्या बेड्या

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे पोलिसांकडून सायबर फ्रॉड करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीचा पर्दाफाश करत नेपाळच्या २ आरोपींसह तामिळनाडूमधील १ अशा ३ आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. पुण्यात एका इसमाला फसवत ६८ लाख ११ हजार ६९२ रुपयांची फसवणूक केल्याससह अटक आरोपींवर मुंबई पुण्यासह बेंगलोर मध्ये देखील सायबर फसवणूक केल्या प्रकरणी गुन्हे दाखल आहेत.

शेअर मार्केट मध्ये ऑनलाईन गुंतवणूक करायला सांगून टोळीकडून अनेक लोकांची कोट्यावधी रुपयांची





फसवणुक देखील करण्यात आली आहे. लाचीन शेर्पा (नेपाळ),बिन बहादूर प्रधान (नेपाळ), तर रमेश कुमार अभिमन्यू (तमिळनाडू) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावं असुन, अटक आरोपींकडून ७ मोबाईल,अनेक बँकांचे पासबुक, चेकबुक, यासह बनावट पासपोर्ट देखील पुणे पोलिसांकडून जप्त करण्यात आले आहेत.

सदर टोळी ही आंतरराष्ट्रीय सायबर गुन्हेगारांसाठी काम करत असून ५० अकाउंट वरून १३ कोटी रुपयांची उलाढाल केल्याची माहिती पोलीस उपयुक्त संभाजी कदम यांनी यावेळी दिली.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे झ्युरिकमध्ये उत्स्फूर्त स्वागत



स्वित्झर्लंड, : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये उपस्थित राहण्यासाठी आज झ्युरिक, स्वित्झर्लंड येथे आगमन झाले. हिंदू स्वयंसेवक संघ आणि सेवा स्वित्झर्लंड संस्थेच्यावतीने त्यांचे आनंदाने स्वागत करण्यात आले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा अभिमान व्यक्त करत, स्थानिक मराठी मंडळींनी पारंपरिक पद्धतीने लेझीम खेळत त्यांचे स्वागत केले.

याप्रसंगी, झ्युरिकमधील लहान मुलांनी मराठी गौरवगीत सादर करत 'पुन्हा येण्या'ची भावना अधोरेखित केली. वेदांत, हृषिकेश, रश्मी आणि अद्रिका या चिमुकल्या दोस्तांनी आपल्या निरागस शुभेच्छा देऊन उपस्थितांचे मन जिंकले.

या स्वागत समारंभाला भारतीय राजदूत मृदुलकुमार आणि उत्तर प्रदेशचे मुख्य सचिव मनोज कुमार सिंह उपस्थित होते. सकाळी ६ वाजता झालेल्या या कार्यक्रमासाठी विविध भागांतून मराठी बांधव आवर्जून उपस्थित राहिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी या उत्स्फूर्त स्वागताबद्दल आनंद व्यक्त करत म्हटले की, या स्वागताने मला घरच्याप्रमाणे वाटले. महाराष्ट्राच्या ऊर्जे ची आणि 'वसुधैव कुटुंबकम'ची भावना येथे अनुभवली.

मुख्यमंत्री फडणवीस 'दावोस समिट २०२५' साठी झ्युरिकमध्ये दाखल झाले आहेत.

## लाडक्या बहिणींचे पैसे कधी जमा होणार? अजित पवारांनी सांगितली तारीख

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** लाडकी बहिण योजनेच्या बाबतीत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोठे वक्तव्य केलं आहे. लाडकी बहिण योजनेचे पैसे कधी मिळणार? याबाबत विविध प्रश्न विचारले जात होते. आज मात्र, अजित पवार यांनी याबाबत माहिती दिली आहे. २६ तारखेच्या आत लाडक्या बहिणींचे पैसे जमा होतील असं वक्तव्य अजित पवार यांनी केले आहे. उद्यापासून विविध विभागांना भेटून बैठका घेणार असल्याचेही अजित पवार यांनी केले. यंदाचा अर्थसंकल्प हा आर्थिक शिस्त लावणारा असणार आहे.

कोणतही यश अपयश कायम नसते

कधी कधी अपयश येते परंतू ते कायम चे नसते. विधानसभा निवडणुकीनंतर आपली जबाबदारी वाढली आहे. म हायुतीला लोकसभेला केवळ १७ जागा मिळाल्या होत्या. मात्र, आता वेगळं चित्र आहे. विधानसभेला आपल्याला चांगलं यश मिळाल्याचे अजित पवार म्हणाले. कोणतही यश अपयश कायम नसतं आपल्याला यात सातत्य ठिकवायच आहे असेही ते म्हणाले.

चुकीचं काम करणाऱ्यांची हकालपट्टी करणार

सध्या पक्षात अनेकजण येत आहेत. पक्षाची बेरीज झाली पाहिजे. मात्र, पक्षाला कमीपणा यायला नको. जनमानसात प्रतिमा खराब असलेल्या व्यक्तीला पक्षात स्थान नको. गैरवर्तणूक होता कामा नये अशा सूचनाही अजित पवार यांनी केल्या. चुकीचे काम करणाऱ्यांची हकालपट्टी केली जाईल असेही अजित पवार म्हणाले.

महायुतीने महिलांना दिले होते २१०० रुपये देण्याचे आश्वासने

लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून राज्यातील महिलांना महिन्याला १५०० रुपये दिले जातात. मात्र, विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीचं सरकार आल्यानंतर महिलांना २१०० रुपये देण्याचे आश्वासनं महायुतीच्या नेत्यांनी दिले होते. तसेच त्यांच्या जाहीरनाम्यात देखील त्यांनी हा मुद्दा सामाविष्ठ केला होता. त्यानंतर सरकार स्थापन होऊन डी महिना झाला आहे. त्यामुळं महिलांना २१०० रुपये कधी मिळणार? असा सवाल उपस्थित केला जात होता. मात्र, अखेर महिलांना २१०० रुपये मिळणार आहेत.

राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर तसेच देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर लाडकी बहिण योजनेबाबत योग्य भूमिका



मांडली होती. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना चालूच राहणार आहे. तसेच आम्ही आश्वासन दिल्याप्रमाणे या योजनेच्या लाभार्थी महिलांना महिन्याला २१०० रुपये लवकरच देण्यात येणार आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली होती. यासह काही महिला निकषात बसत नाहीत, तशा आमच्याकडे तक्रारी आलेल्या आहेत. त्यामुळे अर्जाची छाननी केली जाईल, असे संकेत फडणवीस यांनी दिले होते.

## कृषी प्रदर्शनात सर्व फळांची आईस्क्रीम व बर्फी, मोहोळ येथील राजेंद्र आतकरे शेतकऱ्याचा उपक्रम



**बारामती/प्रतिनिधी :** बारामती कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात आलेले आहे. हे कृषी प्रदर्शन दरम्यान शेतकऱ्यांसाठी खुल असणार आहे. कृषी प्रदर्शनात सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ येथील शेतकऱ्यांनी आपल्या शेतात फळांची लागवड करून ते सेंद्रिय पद्धतीने उत्पादन काढून त्यापासून अनोखा उपक्रम केलेला आहे. या उपक्रमांमध्ये फळांपासून बर्फी आणि आईस्क्रीम च एक नवीन उत्पादन निर्माण केले आहे. कृषी प्रदर्शनात या बर्फी आणि आईस्क्रीम ला मोठ्या प्रमाणात कृषी प्रदर्शन पाहण्यास आलेले शेतकरी भेट देत आहेत.

## पालकमंत्री पदाबद्दल पक्षाने विचारपुर्वक निर्णय घेतलेला आहे – सुनिल तटकरे




दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी :** तीन पक्षाचे सरकार असल्यावर त्या त्या जिल्ह्याचं त्या त्या मंत्र्यांना पालकमंत्री पद मिळेल असं नसतं आमच्या वाट्याला एकूण आठ पालकमंत्री पदे मिळाली आहेत त्याचे योग्य नियोजन करण्यात आलं आहे. महायुती म्हणून जनतेने आम्हाला उदंड प्रतिसाद दिलाय.

पालकमंत्री पदाबद्दल पक्षाने घेतलेला निर्णय हा सर्व प्रतिनिधींना बंधनकारक प्रत्येक मंत्र्याला त्याच्या विधानसभा क्षेत्रात पालकमंत्री पद मिळेल ते शक्य नाही महायुतीचे सरकार आहे त्यामुळे ही बाब समजून घेतली पाहिजे अधिवेशनाला येण्यापूर्वी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी धनंजय मुंडे यांच्याशी फोनवरू सलग दोन दिवस बातचीत केली होती धनंजय मुंडे हे अधिवेशनात मार्गदर्शन करणार असल्याचे सांगितले.

## प्रसिद्ध सिने अभिनेता रितेश देशमुख व जेनेलिया देशमुख सहपरीवार साईचरणी





दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी :** प्रसिद्ध सिने अभिनेता रितेश देशमुख व जेनेलिया देशमुख यांनी सहपरीवार श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानचे वतीने प्रशासकीय अधिकारी प्रज्ञा महांडुळे – सिनारे यांनी त्यांचा शाल व श्री साई मुर्ती देवून सत्कार केला. यावेळी मंदीर प्रमुख विष्णु थोरात, जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके व संरक्षण अधिकारी रोहिदास माळी आदी उपस्थित होते.

# ट्रोल झाल्यानंतर उर्वशी रौतेलाने मागितली सैफ अली खानची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** १६ जानेवारीच्या रात्री सैफ अली खानवर हल्ला झाला. हल्लेखोराने सैफवर सहा वेळा चाकूने वार केले, ज्यामुळे तो गंभीर जखमी झाला आणि त्याला मुंबईतील लीलावती रुग्णालयात दाखल करावे लागले. सैफवर उपचार सुरू आहेत आणि आता तो बरा आहे. या हल्ल्याची माहिती मिळताच खळबळ उडाली.

बॉलिवूड सेलिब्रिटी सैफच्या तब्येतीबद्दल विचारपूस करत असताना, हिने भावनिक पोस्ट करत सैफची माफी मागितली आहे. उर्वशीने माफी का मागितली याचे उत्तर आणि संपूर्ण प्रकरण जाणून घेऊया. त्याआधी उर्वशीच्या माफीनाम्याच्या पोस्टवर एक नजर टाकूया.

उर्वशीने भावनिक पोस्ट केली

उर्वशी रौतेलाने तिच्या इंस्टाग्राम हँडलवर एक भावनिक पोस्ट पोस्ट केली आणि सैफची माफी मागितली. तिने लिहिले, मी हा संदेश खूप दुःखाने आणि मनापासून माफी मागून लिहित आहे कारण मला त्यावेळी माहित नव्हते की तुला काय झाले होते. मला माहित नव्हते की हे प्रकरण इतके गंभीर आहे.

अभिनेत्रीने पुढे लिहिले की, तुम्ही ज्या वेदना सहन करत आहात त्याबद्दल दुःखी होण्याऐवजी, मी माझ्या 'डाकू महाराज' चित्रपटाच्या यशाचा आनंद साजरा करत आहे आणि भेटवस्तू स्वीकारत आहे याची मला लाज वाटते.

अभिनेत्रीने मागितली माफी

त्याने पुढे लिहिले, माझ्या मूर्खपणा आणि असंवेदनशीलतेबद्दल मला माफ करा. जेव्हा मला या प्रकरणाचे गांभीर्य कळले तेव्हा मला खूप वाईट वाटले. मला तुमचे समर्थन करायचे आहे आणि तुमच्या सभ्यतेचे कौतुक करायचे आहे. तुमच्या या ताकदीबद्दल मला आदर आहे.

माफी का मागितलीस?

खरंतर उर्वशी रौतेलाचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये, जेव्हा उर्वशी रौतेलाला सैफवरील हल्ल्याबद्दल आणि त्याच्या प्रकृतीबद्दल विचारण्यात आले तेव्हा तिने विषय बदलला आणि तिच्या अलिकडेच रिलीज झालेल्या डाकू महाराजबद्दल बोलू लागली.

# आयशार व ट्रक अपघातात एक जागीच ठार

## समृद्धी महामार्गावरील नागपूर कॅरीडोअर चानैज नंबर २९५.२ मेहकर पोलीस स्टेशन हद्दीतील घटना




दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बुलढाणा :** आज सकाळी ०५.३० वा दरम्यान पालघर येथून नागपूरच्या दिशेने जात असलेले आयशर क्रमांक च्या चालकाला झोपेची डुलकी लागल्याने समृद्धी महामार्ग चानैज क्रमांक २९५.२ नागपूर कॅरीडोअर वर समोरील ट्रक क्रमांक CG-04-MF-6243 ला पाठीमागून जोरदार धडक दिली यामध्ये आयशर चालक अमित कुमार यादव हा जागेवरच स्टेरिंग मध्ये अडकून मरण पावला घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस चे सपोनी संदीप इंगळे, पीएसआय गजानन उज्जैनकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल गोविंद उबरहंडे, मुकेश जाधव, अमोल हरमकर यांनी तात्काळ घटना स्थळ गाठून आयशरमधील मृतक यांना समृद्धी महामार्गावरील मेहकर येथील QRV टीम चे अजय पाटील, शैलेश मोरे ,पंकज तायडे, यांनी कटरच्या साह्याने पत्रा कापून बाहेर काढले. व तात्काळ समृद्धी महामार्ग ॲम्बुलन्स चे डॉक्टर स्वप्नील सुसर व चालक प्रदीप पडघान यांनी जखमी यांना उपचार केला असता तपासींती डॉक्टरांनी मृत घोषित केले. व मृतक याला मेहकर येथील ग्रामीण रुग्णालय येथे घेऊन गेले. व दोन्ही अपघातग्रस्त दोन्ही वाहने क्रेनच्या साह्याने बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली .पुढील तपास पोलीस स्टेशन मेहेकर करीत आहे.

## मराठी पत्रकार परिषद सिंदखेड राजा तालुका कार्यअध्यक्षपदी भगवान साळवे

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** पत्रकारांची मातृसंस्था असलेल्या मराठी पत्रकार परिषद संलग्नित बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या सिंदखेड राजा तालुका कार्याध्यक्षपदी जेष्ठ पत्रकार भगवान साळवे यांची निवड करण्यात आली.

मातृतीर्थ सिंदखेडराजा तालुका पत्रकार संघाची कार्यकारिणी गठित करण्यासाठी जिल्हाध्यक्ष रणजित राजपूत यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय विश्रामगृहावर बैठक पार पडली असून यामधे कार्याध्यक्ष भगवान साळवे तालुका अध्यक्ष, गजानन मेहेत्रे तर सचिव म्हणून बुद्धू चौधरी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



यावेळी यावेळी शिवाजी मामलकर जिल्हा सचिव, केंद्रीय सदस्य रविंद्र फुलांने , जिल्हा निमंत्रक रामदास कहाळे यांच्या सह राहुल झोटे, एकनाथ म्हस्के, वसीम शेख, आदी पत्रकार उपस्थित होते. यावेळी जिल्हाध्यक्ष रणजित राजपूत यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की लोकशाही मध्ये सर्व पत्रकाराना समान न्याय या पद्धतीने जिल्हा पत्रकार संघात सन्मान केल्या जाईल त्याचा बरोबर पत्रकाराच्या न्याय हक्का साठी सदैव तत्पर असल्याच्या भावना रणजित राजपूत यांनी व्यक्त केल्या यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष गजानन मेहेत्रे, कार्याध्यक्ष भगवान साळवे, तर सचिव म्हणून बुद्धू चौधरी यांचा सत्कार करण्यात आला यावेळी तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते

## महाराष्ट्रात हत्तींना हिवाळी सुट्टी!

दैनिक आपला विदर्भ

**गडचिरोली/प्रतिनिंधी :** मेळघाट किंवा गडचिरोली येथे पर्यटकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यातील हत्तींना पुढील काही दिवस हिवाळी सुट्टीवर पाठवण्यात येणार आहे. त्यामुळे याकाळात गडचिरोली येथे हत्ती पहायला जाणाऱ्यांना हत्ती न दिसण्याचा अंदाज दिला जात आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील कमलापूर येथील सरकारी 'हत्ती छावणी' मध्ये सध्या नऊ हत्ती कार्यरत आहेत. बसंती, रूपा, अजित, मंगला, राणी, प्रियंका, गणेश, लक्ष्मी, कुसुम. तथापि, या नऊ हत्तींना २० जानेवारी ते २९ जानेवारी पर्यत रजेवर पाठवण्यात येत आहे. त्यामुळे 'हत्ती छावणी' दहा दिवसांसाठी बंद राहणार आहे. तर दुसरीकडे मेळघाट व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत कोळकास येथील हत्तींना १० जानेवारी ते २५ जानेवारी अशा १५ दिवसांच्या वैद्यकीय सुट्टीवर पाठवण्यात आले असून या काळात हत्ती



सफारी बंद असणार आहे.

हत्तींच्या हिवाळी सुट्टीमागचे कारण काय?

हत्तींसाठी हा वार्षिक विशेष वैद्यकीय रजेचा काल असतो. जानेवारीच्या थंडीत त्यांच्या पायांना भेगा पडू नये यासाठी त्यांच्या पायांवर विशेष उपचार केले जाते. ज्याला चोपिंग असे म्हणतात. चोपिंगमध्ये हत्तींच्या पायांना ४० ते ४५ औषधी वनस्पतींचं मिश्रण लावण्यात येते. दहा दिवस हत्ती डॉक्टरांच्या देखरेखी खाली असतात. त्यांच्या पायांना अधिकाधिक विश्रांती मिळावी असा उद्देश असल्याने त्यांना फारशी हालचाल करू दिले जात नाही. शिवाय त्यांना कुठलेही काम करू दिले जात नाही. याशिवाय, त्यांच्या प्रकृती संदर्भातील तपासणी, रक्त चाचणी वगैरे केल्या जातात.

## नाशिकच्या पालकमंत्रिपदावरून पत्ता कट, मंत्री दादा भुसेंची पहिली प्रतिक्रिया; म्हणाले...

**नाशिक/प्रतिनिधी :** शनिवारी राज्य सरकारकडून पालकमंत्र्यांची यादी जाहीर करण्यात आली. यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गडचिरोलीचे पालकमंत्रीपद तर उपमुख्यमंत्री अजित पवार हे पुणे आणि बीडचे पालकमंत्री असणार आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मुंबई शहर आणि ठाण्याचे पालकमंत्रिपद देण्यात आले आहे. तर नाशिकचे पालकमंत्रीपद गिरीश महाजन यांच्याकडे देण्यात आले आहे. नाशिकमधून पालकमंत्रीपदासाठी राज्याचे शालेय शिक्षण मंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते दादा भुसे इच्छुक होते. आता नाशिकच्या पालकमंत्रिपदावरून पत्ता कट झाल्यानंतर मंत्री दादा भुसे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

दादा भुसे म्हणाले की, असं काही नसतं, डावलणे वैगरे अशातला काही भाग नाही. जी जबाबदारी दिली ती पुढे नेणे हे प्रत्येक कार्यकर्त्याचे काम असते. मला या ठिकाणी जी काही जबाबदारी दिली ती आम्ही पुढे नेऊ. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी संवाद साधून निर्णय केले आहेत. ते निर्णय पुढे नेणे हे कार्यकर्ता म्हणून आमची जबाबदारी असल्याचे त्यांनी म्हटले.

दहावी-बारावीच्या परीक्षेसाठीच्या हॉल तिकीटांवर जातीच्या प्रवर्गाचा उल्लेख करण्यात आला होता. १२ वीच्या विद्यार्थ्यांना हॉल तिकिटचे वाटपही करण्यात आले. पण, टीकेनंतर महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दिलगिरी व्यक्त करत हा निर्णय रद्द केला. याबाबत शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे म्हणाले की, जात प्रवर्गाचा उल्लेख करण्यात आला ही वस्तुस्थिती आहे. विभागाकडून दिलगिरी व्यक्त करण्यात आली आहे. त्या पाठीमागचा उद्देश असा होता, की त्या विद्यार्थ्यांना भविष्यकाळातील काही योजनांचा लाभ देण्याच्या दृष्टिकोनातून तो कॉलम टाकण्यात आला होता. परंतु तो आता पाठीमागे घेण्यात आला आहे.

## गावातील शेतरस्ते, शिवार रस्ते, पाणंद रस्ते खुले होणार

### आजपासून ३१ मार्चपर्यंत जिल्हा महसूल प्रशासनाचा कालबद्ध कार्यक्रम

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिंधी :** बुलढाणा जिल्ह्यातील सर्व तालुक्यामधील सर्व गावामध्ये शेतरस्ते, शिवार रस्ते, पाणंद रस्ते कालबद्धरितीने खुले करण्यासाठी जिल्हा महसूल प्रशासनाने २० जानेवारी ते ३१ मार्च २०२५ पर्यंतचा कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यानुषंगाने कार्यपद्धती निश्र्चित करण्यात आली असून या कालबद्ध कार्यक्रमाचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी नुकतेच जारी केले आहे.

या कालबद्ध कार्यक्रमानुसार...

पहिल्या टप्प्यात दि २० ते २४ जानेवारीपर्यंत संबंधित गावच्या तलाठी यांनी उपअधिक्षक भूमी अभिलेख यांच्याकडुन ग्रामीण गाडी मार्ग (पोटखराब), पायमार्ग नमूद असलेले गाव नकाशे प्राप्त करून घेणे. दुसऱ्या टप्प्यात दि. २५ ते ३१ जानेवारी पर्यंत या नकाशातील ग्रामीण गाडी मार्ग (पोटखराब), पायमार्ग हे प्रत्यक्ष भेट देऊन त्यातील बंद असलेल्या रस्त्याची यादी तयार करणे. तिसऱ्या टप्प्यात दि. १ ते ७ फेब्रुवारीपर्यंत बंद असलेले रस्ते ज्या भुमापन क्रमांकातून जातात त्यांचे भोगवटाधारकांची यादी तयार करणे.

चौथ्या टप्प्यात दि. ८ ते १५ फेब्रुवारीपर्यंत भोगवटाधारक व गावातील सरपंच व इतर सहधारक यांची सदर रस्ता खुला करण्याबाबत बैठक आयोजित करुन समन्वयाने व सर्वसहमतीने रस्ता खुला करण्यासाठी प्रयत्न करणे, तसेच मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम ५ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार तहसिलदार यांच्याकडे दाखल असलेल्या प्रकरणात सर्व पक्षकार गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती, सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी, कृषि सेवक यांच्या समवेत त्या त्या वादग्रस्त ठिकाणी स्थळ निरीक्षण करुन बैठक घेऊन संपवुन सर्व सहमतीने रस्ता खुला करण्यासाठी व दावा निकाली काढण्यासाठी लोकअदालतीच्या निकषानुसार प्रकरणात निर्णय घेणे.

पाचव्या टप्प्यात दि. १६ ते २८ फेब्रुवारीपर्यंत चौथ्या टप्प्यातील प्रयत्नातून रस्ता खुला होत नसल्यास उपअधिक्षक भूमी अभिलेख यांच्या सहाय्याने रस्ता निश्र्चित करुन पोलिसांचे सहाय्याने तो खुला करणे.

या कालबद्ध कार्यक्रमाच्या अंतिम टप्यात दि. १ ते ३१ मार्चपर्यंत पाचव्या टप्प्यानुसार रस्ता खुला न झालेल्या प्रकरणांमध्ये मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम ५ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार अर्ज प्राप्त करुन घेऊन उचित नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

या कालबद्ध कार्यक्रमाच्या अनुषंगाने सर्व उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी),सर्व तहसिलदार, गटविकास अधिकारी, उपअधीक्षक भूमी अभिलेख व पोलीस निरीक्षक यांनी समन्वयाने कामकाज करून ग्रामीण भागातील ग्रामीण गाडी मार्ग (पोटखराब) पायमार्ग कालबद्धरितीने खुले करावे, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहेत..

## रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या बेशिस्त आटोरिक्षा तसेच कर्णकर्कश बुलेट गाड्यांना आवर घालण्याची चंदनझीरा येथील नागरीकांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालना शहरातील चंदनझीरा,सुंदरनगर येथे बेशिस्त आटोचालकांच्या वतीने रहदारीस अडथळा निर्माण करून आडवे तिडवे आटो ऊभे करून मनमानी करण्याचे प्रमाण हल्ली वाढले आहे. चंदनझीरा येथील म. फुले चौक,मौलाना आझाद चौक या परिसरात सायंकाळच्या सुमारास आटो चालकांचा प्रचंड त्रास सर्वसामान्य नागरीकांना होत आहे.




तसेच परिसरातील स्थानिक व्यावसायिक आटो चालकाच्या त्रासाला कंटाळले आहेत. त्यांना समजावण्यास गेल्यास अरेरावीची भाषा करून भांडणावर ऊतरत आहेत. यामुळे स्थानिक नागरिक आणि आटोचालक यांच्यात नेहमी वादविवाद झाल्याचे दिसून येत आहे.या नेहमीच्या त्रासाला कंटाळून चंदनझीरा येथीसल सुज्ञ नागरीकांनी आज दि.१९ रविवार रोजी दुपारी बारा वा.च्या सुमारास चंदनझीरा पोलीस ठाणे येथे लेखी निवेदन दिले.

दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की चंदनझीरा येथील महात्मा फुले चौक, मौलाना आझाद चौक, इंद्रायणी हॉटेल तसेच सुंदर नगर येथील मेन रोडवर ऑटो चालकांमुळे रहदारीस प्रचंड अडथळा निर्माण होत असून सामान्य नागरिक तसेच येथील स्थानिक व्यापाऱ्यां मध्ये ऑटोरिक्षां चालकांसोबत वादविवाद होत आहेत. काही ऑटो चालक अरेरावेची भाषा करीत असून एखादे वेळेस कायदा व सुव्यवस्थेला बाधा होईल असे प्रकरण घडण्याची शक्यता नाकारता येणार नाही. काही ऑटोना नंबर प्लेट नाही तर काही ऑटो चालक अल्पवयीन आहेत. यामुळे पोलिसांनी याकडे लक्ष देऊन आटोरिक्षा चालकांना त्यांना नेमून दिलेल्या स्टापवर व्यवस्थित थांबण्याचे सांगून योग्य ती कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे चंदनझीरा तसेच सुंदर नगर परिसरामध्ये कर्णकरकश आवाजा मध्ये फटाके फोडून बुलेट गाड्या अति वेगाने पळवण्याचे जणूकाही शर्यत लागले असल्यासारखे बुलेट गाड्या गल्लीबोळात पळवत आहेत. अत्यंत जोरामध्ये एक्सलेटर वाढवून बुलेटच्या फटाक्यांसारखा आवाज फोडण्याचे प्रकार मागच्या काही दिवसांमध्ये चंदनझीरा परिसरामध्ये वाढले आहेत.यामुळे लहान बालके, वयोवृद्ध तसेच आजारी रुग्णांना प्रचंड त्रास होत आहे. कर्णकरकश आवाज करणाऱ्या बुलेट गाड्या चालकांना समजावण्यास गेल्यास वाद-विवाद होत आहे आणि त्यामुळे कोणीही या बुलेट वाल्यांना सांगण्यासाठी धजावत नाही त्यामुळे फटाके फोडणाऱ्या तसेच कर्णकर्कश आवाज करणाऱ्या या बुलेट गाड्यांवर आवर घालण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या ऑटो चालकाविरोधात तसेच फटाके फोडणाऱ्या बुलेट चालकांविरोधात लवकरच कारवाई करण्यात येईल असे आश्र्वासन चंदनझीरा पोलिसांकडून देण्यात आले आहे. चंदनझीरा पोलिसांनी नागरिकांच्या मागणीची दखल घेतली नाही तर येणाऱ्या काळामध्ये या विरोधात मोठे आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा नागरिकांच्या वतीने देण्यात आला आहे.

## विविध वृत्त...


### गोंदियात काँग्रेसला मोठा धक्का, काँग्रेसचे जिल्हा महासचिव नीलम हलमारे यांचा शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश




दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला अपयश आले. विशेषतः प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांचा गृह जिल्हा असलेल्या भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात केवळ एक जागा काँग्रेस पक्षाला जिंकता आली. त्यांनतर गोंदिया जिल्ह्यात काँग्रेसचे अनेक मोठे नेते काँग्रेस पक्ष सोडण्याच्या तयारीत असल्याची चर्चा होती. नाना पटोले यांचे खंदे समर्थक असलेले व गोंदिया जिल्हा काँग्रेसचे महासचिव नीलम हलमारे यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह आज भाजप मध्ये प्रवेश केला. आज दुपारी गोंदिया शहरातील प्रीतम लॉन या ठिकाणी भाजपाचे आमदार विनोद अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासोबत छावा संग्राम परिषदेपासून होतो. मागील २० वर्षे त्यांच्यासोबत काम केला मात्र त्यांनी कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत नीलम हलमारे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

### इन्स्टाग्रामवर मैत्री करुन मुलीला धमकवणाऱ्या आरोपीला मानपाडा पोलिसांनी ठोकल्या बेड्या





दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कोरोना काळात ऑनलाईन शिक्षण असताना नववीत शिकत असलेल्या एका विद्यार्थिनीची इंस्टाग्राम च्या माध्यमातून एका तरुणाशी मैत्री झाली. या तरुणाने आई आजारी असल्याचे भासवुन मुलीकडून काही पैसे घेतले. नंतर इंस्टाग्राम वर अश्र्लील फोटो फोटो पाठवत तिला ब्लॅकमेल करायला लागला .जवळपास पाच वर्ष हा तरुण त्या अल्पवयीन विद्यार्थिनीला ब्लॅकमेल करून तिच्याकडून पैसे उकळत होता मात्र अखेर विद्यार्थिनीच्या नातेवाईकांना ही बाब लक्षात आले त्यांनी या प्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात धाव घेतली. अखेर मनपाडा पोलिसांनी संभाजीनगर येथून आकाश दाभाडे नावाच्या तरुणाला अटक केली. आकाशने आणखी किती मुलींना अशा प्रकारे ब्लॅकमेल केले याचा तपास आता मानपाडा पोलीस करत आहेत.

### राज्यपालांच्या उपस्थितीत मुंबई मॅरेथॉनचा आरंभ; गीतकार गुलजार यांचा स्पर्धेत सहभाग



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनससमोरून टाटा मुंबई मॅरेथॉन 'एलिट' स्पर्धेला स्पोर्ट्स गनने बार करुन रवाना केले. यावेळी 'चॅम्पियन्स विथ डिसॅबिलिटीज' - दिव्यांग व्यक्तींची स्पर्धा तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या स्पर्धेला देखील राज्यपालांच्या उपस्थितीत आरंभ झाला. गीतकार गुलजार यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या स्पर्धेत सहभाग घेतला. राज्याचे क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस, कार्यक्रमाचे आयोजक अनिल सिंह व विवेक सिंग आणि गणमान्य नागरिक उपस्थित होते. यंदाच्या मॅरेथॉनमध्ये ६० हजार स्पर्धक सहभागी होत असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

